**नियमित फौजदारी खटला क्रं.६५४/२००९.**
**निशाणी नं.६९**

**CNR No.MHPU060014552009**
**सरकार तर्फे साक्षीदार क्रं.४.**

**सरतपास शपथेवर सुरु.**

नाव : सय्यद शफाक अहमद,

वय ६१ वर्षे, धंदा : व्यवसाय,

राहणार : ठक्कर अपार्टमेंट, कॅम्प, पुणे.

**सरतपास सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती ए. के. नवगिरे.**

१. मी आरोपींना नावाने ओळखत नाही. फेब्रुवारी २००९ मध्ये माझ्याकडे माझे ऑफीस भाडयाने आरोपी मागण्यासाठी आले होते. त्यांना त्यावेळी मोबाईल व्यवसाय करण्यासाठी ऑफिस आवश्यक होते. मी माझे ६४ नंबरचे दुकान भाड्याने दिले होते. त्यावेळी ४,०००/- रुपये भाडे व १०,०००/- डिपॉसिट ठरले होते. नोंदणीचा खर्च अर्धा करण्याचे ठरले होते. मी त्यांना दुकानाची चावी दिली होती. त्यांनी त्यांचा व्यवसाय सुरु केला. परंतु त्यांनी मोबाईलचा व्यवसाय सुरु न करता दुसरा मार्केटींगचा व्यवसाय सुरु केला. तो मला पटला नाही. त्यामुळे मी त्यांना दुकान खाली करा, असे सांगितले. त्यावरुन ते सर्व सामान घेऊन गेले. त्यांनी मला डिपॉसिट व भाडे दिले नाही. पोलिसांनी माझ्याकडे त्याबाबत विचारपुस केली होती. मी दुकान भाडयाने दिलेल्या व्यक्तीसारखा व्यक्ती आज निळ्या रंगाचा शर्ट घालून कोर्टात हजर आहे. (तो आरोपी क्रं. २ आहे.)

**उलटतपास आरोपी क्रं. १ तर्फे**

२. पुकारता आरोपी व विधिज्ञ गैरहजर. सबब उलटतपास नाही.

**उलटतपास आरोपी क्रं. २ व ३ तर्फे वकील श्री. एस.डी.बडे –**

३. मी २००९ पुर्वीपासुन रिअल इस्टेटचा व्यवसाय करतो. सदर मी २००७-०८ साली खरेदी घेतले. हे म्हणणे खरे आहे की, दुकान भाडयाने देण्याआधी करार करतो, करार केल्यानंतर दुकानाची चावी भाडेकरुस देतो. हे म्हणणे खरे आहे की, भूषण नावाच्या व्यक्तीशी २००९ पुर्वी ओळख नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, अनोळखी व्यक्तीला चावी द्यायला नाही पाहिजे. त्यांना खुप घाई असल्याने करार न करता मी चावी दिली. करारपत्र ४-५ दिवसांनी करु, असे मी त्यांना सांगितले. माझ्या जबाबात नमुद केलेले साहित्य त्यांनी माझ्या समक्ष ठेवले नव्हते. भूषण नावाच्या व्यक्तीनेच मला मोबाईल व मार्केटिंगचा व्यवसाय करतो, असे सांगितले.

**<u>नियमित फौजदारी खटला क्रं.६५४/२००९.</u>**
**निशाणी नं.६९**

प्रश्न – भूषण नावाचा व्यक्ती मार्केर्टिंगची कामे करतो, हे तुम्हाला समजले की कोणी सांगितले ?

उत्तर – ते दिसतच होते. दुकानात लोकांची गर्दी होत होती. मी विचारणा केली असता मार्केटिंगचे काम करत असल्याचे समजले. ते त्यांच्या स्कीम बद्दल बोलत होते. पैसे देण्या–घेण्याची स्कीम आहे, असे सांगत होते.

त्यावरुन मला ते मार्केटिंगचे काम करत असल्याचे वाटले. मी स्वतः कोणाकडे चौकशी केली नाही.

४. मी कोर्टात हजर निळा रंगाचा शर्ट घातलेला व्यक्ती भूषण आहे, हे मी नक्की सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फेब्रुवारी २००९ मध्ये भूषण नावाचा व्यक्ती माझ्याकडे दुकान भाड्याने मागण्यासाठी आला, आमच्या ४०००/– भाडे व १०,०००/– डिपॉसिट ठरले, मी त्यास दुकानाची चावी दिली, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो मोबाईल व्यवसाय न करता मार्केटिंग करु लागला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे सरतपासात सांगितलेला मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

DHANAJI JAYSING PATIL
Digitally signed by DHANAJI JAYSING PATIL
Date: 2022.10.20 11:38:50 +0530

दिनांक : १९/१०/२०२२.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.